पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २३/०४/२०१९

## ''गडचिरोली पोलीस दलातील १०२ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह''

महाराष्ट्र राज्यात उल्लेखनिय व विशेष कामगीरी करणा-या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येते. यावर्षी नुकत्याच जाहीर झालेल्या यादीमध्ये महाराष्ट्र राज्यातील एकुण ८०० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह घोषित करण्यात आलेले आहे. त्यापैकी नक्षलदृष्टया अतीसंवेदनशिल व दुर्गम अशा गडचिरोली जिल्हयातील एकुण १०२ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.

यामध्ये ०४ अपर पोलीस अधिक्षक, ०३ सहा.पोलीस निरीक्षक, १६ पोलीस उपनिरीक्षक, ७९ पोलीस कर्मचारी यांचा समावेश आहे. यामध्ये तत्कालिन अपर पोलीस अधिक्षक व सध्या चंद्रपुर जिल्हयात कार्यरत असलेले पोलीस अधिक्षक श्री.महेश्वर रेड्डी, तत्कालिन अपर पोलीस अधिक्षक व सध्या उस्मानाबाद जिल्हयात कार्यरत असलेले पोलीस अधिक्षक श्री.राजा रामासामी,सध्या कार्यरत अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) गडचिरोली श्री.महेंद्र पंडित, अपर पोलीस अधिक्षक (अभियान) गडचिरोली डॉ.श्री.हरी बालाजी यांचा सामावेश आहे. पुरस्कार प्राप्त सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ०१.०५.२०१९ रोजी महाराष्ट्र दिनी पोलीस सन्मान चिन्ह प्रदान करण्यात येणार आहे.

वरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह प्राप्त झाले असुन सदर बाब ही गडचिरोली पोलीस दलासाठी गौरवास्पद आहे. पुरस्कार प्राप्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे मा.पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री.शैलेश बलकवडे यांनी मनपुर्वक अभिनंदन केले आहे.


मा. महेंद्र पंडित सो.


मा. महेश्वर रेड्डी सो


मा.हरी बालाजी सो


मा.राजारामासामी सो.

–